महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२२ वे | दिनांक : ०७/०८/२०२६ | वार : शुक्रवार

## 'शिवसेना कोणाची? जनतेनेच निकाल दिला': विरोधकांवर एकनाथ शिंदे यांचा घणाघात



**मुंबई :** शिवसेना पक्षाच्या मालकीबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर कडाडून हल्ला चढवत, "शिवसेना कोणाची याचा निकाल महाराष्ट्राच्या जनतेने आधीच दिला आहे. आम्ही ४० आमदारांसह बाहेर पडलो आणि जनतेने आम्हाला ६० आमदारांपर्यंत पोहोचवून आपल्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले," असे ठाम शब्दांत सांगितले.

एकनाथ शिंदे म्हणाले, "जनतेच्या न्यायालयात आमचा विजय आधीच झाला आहे. त्यामुळे शिवसेना कोणाची, याचे उत्तर महाराष्ट्रातील जनतेने लोकशाहीच्या माध्यमातून स्पष्टपणे दिले आहे. आता न्यायालयीन प्रक्रियेवरही आमचा पूर्ण विश्वास आहे."

विरोधकांच्या सातत्याने करण्यात आलेल्या 'घटनाबाह्य सरकार'च्या आरोपांचा समाचार घेताना त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या निकालाचा उल्लेख केला. "सरकार संविधानाने आणि कायद्याने घालून दिलेल्या प्रक्रियेनुसार स्थापन झाले असून ते घटनाबाह्य नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तरीही विरोधक तीच जुनी आणि फाटलेली कॅसेट पुन्हा पुन्हा वाजवत आहेत," असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला.

पुढे एकनाथ शिंदे म्हणाले, "विरोधकांची भूमिका दुटप्पी आहे. निकाल त्यांच्या बाजूने लागला तर न्यायालयाचा गौरव करायचा आणि निकाल विरोधात गेला की न्यायालयालाच शिकवण्याचा प्रयत्न करायचा. न्यायव्यवस्थेवर आरोप, निवडणूक आयोगावर टीका आणि घटनात्मक संस्थांवर अविश्वास दाखवणे, ही त्यांची कायमची राजकीय संस्कृती आहे."

"आम्ही कोणावरही वैयक्तिक टीका करत नाही. आम्ही जनतेच्या विश्वासावर आणि न्यायदेवतेवर श्रद्धा ठेवतो. सत्य, संविधान आणि जनमत या तिन्ही गोष्टी आमच्या बाजूने असल्याने आम्ही निर्धास्त आहोत," असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेना कोणाची, या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर लढाई सुरू असली तरी राजकीय आणि जनाधाराच्या कसोटीवर शिवसेनेवर जनतेनेच शिक्कामोर्तब केले आहे, असा ठाम दावा करत एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या भूमिकेवर जोरदार प्रहार केला.

## १ लाखांहून अधिक अमराठी चालकांनी गिरवले व्यवहारिक मराठीचे धडे



**मुंबई :** "महाराष्ट्रात रोजगार करायचा असेल, तर मराठीशी नाळ जोडलीच पाहिजे. ही सक्तीची नव्हे, तर आपुलकीची भाषा आहे. प्रवाशांशी दोन प्रेमाचे शब्द मराठीत बोलणारा प्रत्येक चालक हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सन्मान करणारा दूत ठरतो," अशा भावनिक शब्दांत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी शिकवणी अभियानाला' मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले.

या अभियानांतर्गत राज्यभरातील १ लाखांहून अधिक अमराठी व्यावसायिक प्रवासी वाहन चालकांनी व्यवहारिक मराठीचे धडे यशस्वीरित्या पूर्ण केले असून, उर्वरित चालकांनीही १५ ऑगस्टपूर्वी या संधीचा लाभ घेऊन मराठी शिकावे, असे आवाहन प्रताप सरनाईक यांनी केले. या अभियानाच्या आढावा बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, ज्येष्ठ साहित्यिक प्रदीप ढवण, मुंबई मराठी साहित्य संघ तसेच कोकण मराठी साहित्य परिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रताप सरनाईक म्हणाले, "मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि संस्कृतीचा आत्मा आहे. येथे उपजीविका करणाऱ्या प्रत्येकाने मराठीचा सन्मान करावा, हा आमचा प्रामाणिक आग्रह आहे. प्रवाशांशी संवाद साधताना मराठीचा वापर झाला, तर केवळ व्यवहार सुलभ होणार नाही, तर माणसामाणसांमधील आपुलकीचे बंधही अधिक दृढ होतील."

प्रताप सरनाईक पुढे म्हणाले की, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर तिच्या गौरवासाठी राबविण्यात आलेल्या या अभियानाला लाखो अमराठी बांधवांनी सकारात्मक आणि सन्मानपूर्वक प्रतिसाद दिला आहे. मराठी शिकण्याचा त्यांचा हा स्वयंस्फूर्त सहभाग म्हणजे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मराठीप्रेमाला वाहिलेली खरी आदरांजली आहे.

राज्य शासनाचा मराठी भाषा विभाग, मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषदेच्या संयुक्त सहकार्याने हे अभियान राज्यभर लोकचळवळीचे स्वरूप धारण करत आहे. मराठी शिकण्याची ही संधी स्वीकारणारा प्रत्येक चालक हा केवळ नियमांचे पालन करणारा नव्हे, तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सन्मान करणारा संवेदनशील नागरिक ठरत असल्याचेही सरनाईक यांनी नमूद केले.

## 'त्वचादानासाठी देशात सक्षम यंत्रणा उभारा' : खासदार विनोद तावडेंची राज्यसभेत आग्रही मागणी



**मुंबई :** गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी देशात त्वचादान आणि 'स्किन बँकिंग'ची व्यवस्था अधिक मजबूत करण्याची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस व राज्यसभा खासदार विनोद तावडे यांनी आज राज्यसभेत केले. या संवेदनशील मुद्द्याकडे सरकारचे लक्ष वेधताना त्यांनी संपूर्ण देशभरात त्वचादानासाठी व्यापक यंत्रणा उभारण्याची मागणी केली. तसेच 'नोटो' (NOTTO) अंतर्गत देशभरात स्किन बँक्सची स्थापना, कोल्ड-चेन नेटवर्कची उभारणी आणि याविषयीची जनजागृती वाढवण्याचे महत्त्वपूर्ण आवाहनही त्यांनी केंद्र सरकारला केले आहे.

विनोद तावडे म्हणाले की, गंभीर भाजलेल्या रुग्णांसाठी दान केलेली त्वचा ही एखाद्या संरक्षकासारखे काम करते. यामुळे रुग्णाच्या शरीराला संसर्ग होत नाही आणि शरीरातील पाणी कमी होत नाही. कायमस्वरूपी उपचार होईपर्यंत ही त्वचा रुग्णाचा जीव वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. सरकारने 'NOTTO' (राष्ट्रीय अवयव आणि उती प्रत्यारोपण संघटना) च्या माध्यमातून अवयवदानासाठी चांगले काम केले आहे. मात्र, त्वचादानाबाबत अजूनही समाजात पुरेशी जनजागृती झालेली नाही. जर आपण स्किन बँक्सची संख्या वाढवली आणि संपूर्ण देशात त्वचा संकलनाची उत्तम व्यवस्था केली, तर हजारो रुग्णांना वेळेवर मदत मिळू शकेल, असे तावडे यांनी म्हटले आहे.

त्वचादानाबाबतची सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, मृत्यूनंतर ६ तासांच्या आत हे दान करता येते आणि त्यासाठी रक्तगट जुळण्याची कोणतीही आवश्यकता नसते. यामध्ये केवळ त्वचेचा वरचा थर काढला जात असल्याने मृतदेहाचे विद्रूपीकरण होत नाही, शिवाय योग्य पद्धतीने जतन केलेली ही त्वचा ५ वर्षांपर्यंत वापरता येते.

याविषयी आपल्या भावना व्यक्त करताना खासदार विनोद तावडे म्हणाले की, माझ्या आईच्या निधनानंतर हा विषय माझ्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा बनला आहे. म्हणूनच, 'नोटो' (NOTTO) अंतर्गत त्वचादानासाठी एक भक्कम राष्ट्रीय व्यवस्था उभारली जावी, अशी माझी सरकारला विनंती आहे. आधुनिक स्किन बँक्सची उभारणी, जलद वाहतूक व्यवस्था आणि देशभरात व्यापक जनजागृती मोहीम राबवणे गरजेचे आहे, जेणेकरून कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचाराअभावी मृत्यू होणार नाही.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ ऑगस्ट २०२६


## 'लेट्स मेक इंडिया हेल्दी मिशन-२०२६' अंतर्गत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात निसर्गोपचार व आरोग्य जनजागृती



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथे 'LET'S MAKE INDIA HEALTHY MISSION – २०२६' अंतर्गत जालना प्रकल्पाच्या माध्यमातून निसर्गोपचार व आरोग्य जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमातून निरोगी जीवनशैली, आजारांचे प्रतिबंध आणि नैसर्गिक उपचारपद्धतींचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.कार्यक्रमात निसर्गोपचार संस्था, पुणे येथील निसर्गोपचार तज्ज्ञ सिद्धांत तावरे यांनी मार्गदर्शन केले. बदलती जीवनशैली, वाढता ताणतणाव आणि कामकाजातील बदलांमुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत असून अनेकांना निवृत्तीपूर्वीच नियमित औषधोपचारांचा आधार घ्यावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा आजार होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी त्यांनी घरगुती व नैसर्गिक उपचारांचे महत्त्व विशद करत दैनंदिन जीवनात सहज उपलब्ध असलेल्या पदार्थांपासून विविध आजारांवरील नैसर्गिक उपाय कसे करता येतात, याची माहिती दिली. तसेच संतुलित आहार, नियमित दिनचर्या आणि आरोग्यदायी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांचे मोफत नाडी परीक्षण करण्यात आले. प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार योग्य आहार, शरीरातील दोषांचे स्वरूप आणि त्यावरील घरगुती उपाय याविषयी वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय हाडांचे विकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, पीसीओडी, त्वचारोग आदी आजारांवर निसर्गोपचार पद्धतीद्वारे उपलब्ध उपचारांची माहिती देण्यात आली.


गरजूंना संबंधित नैसर्गिक उपचारांचा लाभ विनामूल्य उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती श्री. तावरे यांनी दिली.अशा प्रकारचे आरोग्य जनजागृती आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक उपक्रम नियमितपणे आयोजित होणे काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, आरोग्य समितीचे प्रमुख डॉ.

## राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांची अंजना एक्सलेन्स शाळेला सदिच्छा भेट



**दौलताबाद (जावेद अहमद) :** राज्यमंत्री आशीष जैस्वाल वित्त नियोजन,मदत व पुनर्वसन, कायदा व न्याय मंत्री हे जालना येथे कार्यक्रमाला जात असताना त्यांनी आसेगाव येथील अंजना शाळेला दि ०६ गुरुवारी भेट दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलेयावेळी विद्यार्थिनीं त्यांचे औक्षण केले शाळेचे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ यांनी त्यांचे स्वागत केलेग्रामीण भागात इतकी सुंदर व मोठी इतकी मोठ्या प्रमाणावर विध्यार्थी असलेल्या शाळा असल्याचे त्यांनी कौतुक केले आहे. त्यांनी सांगितले विध्यार्थी हा कलागुणांनी व योग्य शिक्षणाची दिशा मिळाली तर ते देशाचे भवितव्य घडू शकते आज बसलेले विद्यार्थी उद्या देशाच्या मोठमोठे अधिकारी म्हणून दिसू शकतात ज्याच्याकडे इच्छा शक्ती असते व जिद्द असते आणि समाजासाठी काही करण्याची इच्छा असतेभारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत २०४७ चा नियोजन केलेला आहे यासाठी महाराष्ट्र चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित भारत २०४७ चा आराखडा तयार केलेले आहे या नियोजन मध्ये समाजातील सर्व लोकांनी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काम करण्याची गरज आहे यात भष्टाचार मुक्त समाज, उत्तम आरोग्य आणि शिक्षण, आर्थिक समानता आणि पर्यावरणरक्षण असे आहेहे सर्व करत असताना कोणा एकामुळे हे शक्य नाही तर सर्वांनी मिळून हातभार लावावा लागेल तरच महाराष्ट्र व देश पुढे जाईल असे त्यांनी सांगितले.

यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ, उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ, मुख्याध्यापिका स्नेहा पवार, व्यवस्थापक देव साठे सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते



## प्रेमचंद जयंतीनिमित्त ऑनलाइन प्रश्नमंजुषेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक कला महिला महाविद्यालय, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर येथील हिंदी विभागाच्या वतीने प्रेमचंद जयंतीनिमित्त वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचा संयुक्त कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला.यानिमित्त हिंदी साहित्यातील महान कथाकार मुंशी प्रेमचंद यांचे जीवन व साहित्यिक योगदान या विषयावर ऑनलाइन प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले. या प्रश्नमंजुषेमध्ये प्रेमचंद यांचे जीवन, साहित्य आणि हिंदी साहित्यातील योगदानावर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता.वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थिनींसाठी Google Form च्या माध्यमातून प्रश्नमंजुषा तयार करून त्याची लिंक उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला .प्रश्नमंजुषेच्या आयोजन व नियोजनामध्ये प्रा. पूजा मुट्ठे यांनी विशेष योगदान दिले. तसेच प्रा. सुचित्रा कुलकर्णी आणि प्रा. डॉ. शोभा हनवते यांनी विद्यार्थिनींना ऑनलाइन प्रश्नमंजुषा कशी सोडवावी याबाबत मार्गदर्शन केले.हिंदी विभागप्रमुख डॉ. रमा दुधमांडे यांच्या प्रोत्साहन व मार्गदर्शनामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मुंशी प्रेमचंद यांच्या जीवनकार्याची व साहित्यिक योगदानाची ओळख होण्याबरोबरच हिंदी साहित्याविषयी अभिरुची निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ ऑगस्ट २०२६


## बालरंगभूमी परिषदेतर्फे 'आम्ही नाटक करीत आहोत'चे सादरीकरण




**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची संलग्न संस्था बालरंगभूमी परिषद या संस्थेतर्फे २ ऑगस्ट हा दिवस मराठी बालनाट्य दिवस म्हणून साजरा करण्यात येते. २ ऑगस्ट १९५९ रोजी स्व. रत्नाकर मतकरी लिखित स्व. सुधाताई करमरकर दिग्दर्शित मधुमंजिरी या मराठी बालनाट्याचा प्रयोग व्यावसायिक स्तरावर झाल्याची नोंद असल्याकारणाने बालरंगभूमी परिषदेतर्फे २ ऑगस्ट हा दिवस मराठी बालनाट्य दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने मराठी भाषेचा प्रसार व प्रचार या उद्देश सहित बालरंगभूमी परिषद तर्फे भा. बी. आर्वीकर सभागृह, जीवन विकास ग्रंथालय या ठिकाणी आसेफ अन्सारी लिखित व रमेश सोळंके दिग्दर्शित "आम्ही नाटक करीत आहोत" या बालनाट्याचे सादरीकरण करण्यात आले या बालनाट्यात अरहम शेख (गुड्डू), अगन्या मचे (बंटी) कियान खैरनार (सोनू) मिष्टी रगडे (दीदी) आरोही देवरे (बबली) यांनी भूमिका केल्या. यावेळी २२ वी राज्य बालनाट्य स्पर्धेतील अभिनय गुणवत्ता पुरस्कार प्राप्त अथर्व अथर्व देशमुख याचा सत्कार परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य हसन इनामदार यांच्या हस्ते व अरहम शेख याचा सत्कार कोषाध्यक्ष विनोद आघाव यांच्या हस्ते करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सांस्कृतिक विभाग आयोजित राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत पारितोषिक प्राप्त बालनाट्य"आम्ही नाटक करीत आहोत" मधील बालकलाकारांचा सत्कार ही करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी शरद कुलकर्णी हे होते, यावेळी बालरंगभूमी परिषदेचे छत्रपती संभाजीनगर शाखेचे जिल्हाध्यक्ष आसेफ शेख, प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड, सह कार्यवाहक अर्चना देवधर कार्यकारी सदस्य श्रीपाद पदे ,रमेश सोळुंके लक्ष्मण अहिरे, यावेळी मराठवाडा विभागीय युवा संघटक म्हणून निवड झाल्याबद्दल अभिजीत भातलौंडे यांचा सत्कार करण्यात आला.

## पाठ्यपुस्तकातील लेखक अय्युब पठाण यांना पाहून विद्यार्थी भारावले



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनीधी) :** पाठ्यपुस्तकातील लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक कवी व लेखक निर्माण होऊन मराठी भाषेत गोडी निर्माण होईल असे बीड येथील सात शाळेच्या लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला असताना लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी सादरीकरण करताना सांगितलेले आहे. बीड येथील द.बा. घुमरे पब्लिक स्कूल, यशवंत विद्यालय, शिवाजी विद्यालय, आदर्श विद्यालय,छत्रपती राजश्री शाहू विद्यालय, इंदिरा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय बीड या सहा शाळेमध्ये लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन इयत्ता चौथीच्या अभ्यासक्रमात असणाऱ्या त्यांची "कौतुकाची थाप " या पाठाविषयी विद्यार्थ्यांशी त्यांनी दिलखुलासपणे संवाद साधला आणि पाठाचे प्रभावीपणे सादरीकरण करून दाखविले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष लेखकाला पाहून विद्यार्थी हे भारावून गेले होते, आणि यावेळी त्यांनी लेखकाला अनेक प्रश्न विचारले. लेखकांनीही त्यांच्या प्रश्नाला समर्पक उत्तरे दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. विद्यार्थी हे लेखकाला पाहून अगदी भारावून गेले होते. या कार्यक्रमाच्या प्रसंगी मराठवाड्याचे लोकप्रिय शिक्षक आमदार विक्रमजी वसंतराव काळे, बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण, रवींद्र खोड, नवनाथ मात्रे, पाखरे सर, आणि छत्रपती संभाजी नगर येथील प्रदीप विखे,कवी मनोज खुटे,मुदस्सर पठाण, युवा नेते विपुल काळे, महेश घरत, हे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी बीड शहरातील सहा शाळेतील मुख्याध्यापक, संस्थाचालक, शिक्षक- शिक्षिका आणि विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# १० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

# D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## रस्त्यावरील खड्ड्यामुळे दुचाकी घसरली युवक जखमी

**दौलताबाद (जावेद अहमद) :** धुळे-सोलापूर महामार्गावरील फतीयाबाद गावाजवळ गुरुवारी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या दरम्यान रस्त्यावरील खड्ड्यात दुचाकी आदळून झालेल्या अपघातात राहुल प्रताप राठोड (वय २५, रा. भिलदरा तांडा, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) हा युवक जखमी झाला. मिळालेल्या माहितीनुसार, राहुल राठोड हा एमएच २० जीडी ७८०३ क्रमांकाच्या होंडा सीडी डॉन दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगरहून कन्नडकडे जात होता. फतीयाबाद गावाजवळ रस्त्यावरील खड्ड्यांचा अंदाज न आल्याने दुचाकी खड्ड्यात आदळून घसरली आणि अपघात झाला. अपघातानंतर स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदत करत जखमी राहुल याला जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थेच्या रुग्णवाहिकेतून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ ऑगस्ट २०२६


## डॉ. विशाल तायडे यांच्या ढ' कादंबरीवर छत्रपती संभाजीनगरात चर्चासत्र




**छत्रपती संभाजीनगर :** भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, जिल्हा शाखा छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने बालसाहित्यिक डॉ. विशाल तायडे यांच्या 'ढ' या कादंबरीवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.हे चर्चासत्र सोमवार, ११ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता ग्रामविकास भवन, राष्ट्रमाता जिजाऊ चौक, ठाकरे नगर एन-२ येथे होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. संतोष चव्हाण राहणार आहेत. प्रा. ईश्वर अडसूळ हे कादंबरीवर भाष्य करतील.या चर्चासत्राला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या डॉ. मंजुषा क्षीरसागर, शिवाजी महाविद्यालय, कन्नडचे डॉ. शिवाजी हुसे आणि ग्रामविकास संस्थेचे सचिव नरहरी शिवपुरे उपस्थित राहणार आहेत.असे आवाहन सुनील डोके, जिल्हाध्यक्ष, आणि संयोजन समिती, भाषा साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषदे तर्फे करण्यात आले आहे.

## प्रा. सोनाली शिंदे यांना पीएच. डी. पदवी प्रदान



**कन्नड :** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड येथील मराठी विभागाच्या माजी विद्यार्थीनी प्रा. सोनाली भैय्यासाहेब शिंदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच. डी. पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली. प्रेमराज सारडा महाविद्यालय अहिल्यानगर येथील मराठी संशोधन केंद्रात प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळ गणेश आगरकर विषयक मराठीतील चरित्रपर लेखांचा अभ्यास या विषयावर शोध प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांच्या या यशाबद्दल कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी अभिनंदन केले आहे.

## मतलबी या जगात

काम पडताच सारे,
गोड गोड बोलतात.
काम संपताच मात्र,
दांड्यावर कोलतात. १

मतलबी या जगात
सदा सावध रहावे.
काम काढून सर्वांचे,
गुण एकदा पहावे. २

कोण आपला परका,
तेव्हा तुला कळणार.
जीव लावणारा मित्र,
मदतीसाठी पळणार. ३

स्वार्थी जगात सारेच,
स्वार्थ साधू पाहतात.
वेळ कठीण पाहून,
दूर सारे राहतात. ४

जवळचा माणूसच,
घात आपला करतो.
जीवनात जगतांना,
हाती शत्रूला धरतो. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# निसर्ग संवर्धनासाठी वृक्षरोपण गरजेचे शिवराज भैय्या भुमरे



**छत्रपती संभाजीनगर :** श्री शिवराज भैय्या भुमरे प्रतिष्ठान व शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महावृक्षारोपण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना, छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेचे सदस्य श्री शिवराज भैय्या भुमरे यांनी सांगितले की यावर्षीचा उन्हाळा हा मागील अनेक दशकातील उन्हाळ्यापेक्षा भयंकर असा होता. त्याचा प्रचंड त्रास हा सर्वांनाच झालेला आहे माणसाने प्रचंड जंगल तोंड करून झाडांची संख्या नगण्य केलेली आहे त्यामुळे या महावृक्षरोपण सोहळ्याचे अतिशय महत्त्व आहे आपण या शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या परिसरात महाविद्यालयाला १०३ वर्ष पूर्ण झाल्या चे अवचित्य साधून १०४ वृक्षांची लागवड येथे करत आहोत ही आनंदाची बाब आहे. आपण आज लावत असलेल्या वृक्ष हे या महाविद्यालयाच्या परिसराला आणि छत्रपती संभाजी नगर शहराला याचा फायदा होणार आहे. आजच्या काळात वृक्ष लागवडीचे महत्त्व त्यांनी आपल्या भाषणात सविस्तरपणे विशद केले. या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून रवींद्र जोगदंड सर राज्य कर उपायुक्त वस्तू व सेवा कर मुंबई यांनी आभासी पद्धतीने मुंबईवरून मार्गदर्शन करताना आज जगातील सर्वात मोठा प्रश्न हा पर्यावरण संवर्धनाचा आहे. मानवाने फार मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केले त्यामुळे वृक्षांचे प्रमाण फार कमी झाले आहे वसुंधरेच्या मूळ रूपात कमीत कमी ३३ टक्के वृक्ष असणे गरजेचे आहेत पण भारतात हे प्रमाण २२ टक्के असून महाराष्ट्रात हेच प्रमाण २१% वर आलेले आहे त्यामुळे वृक्षारोपण करून वृक्षांचे प्रमाण वाढवणे ही आजच्या काळाची गरज आहे यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. श्री. मधुकर राजे आर्दड माजी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर विभाग हे होते. आर्दड सरांनी आपल्या मनोगतात, वृक्षारोपण ही आजच्या काळाची गरज आहे संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालातील बाब त्यांनी उपस्थित आमच्या निदर्शनात आणून देत असताना सांगितले की आता दर दिवशी एक एकर जमिनीच्या भूभागाचे वाळवंटीकरण होत आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी वृक्षारोपण गरजेचे असल्याचे सांगताना आजची समाज व्यवस्था ही एखादी गोष्ट जी समाजाच्या साठी, निसर्गासाठी उपयोगाची आहे ती न करता समाजाच्या आणि निसर्गाच्या उपयोगाचे असलेली गोष्ट नष्ट करण्याकडे आपण लक्ष देत आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होऊन निसर्गाची प्रचंड झाली आहे. जंगलतोडीमुळे एक मोठं संकट जगापुढे भीषण अशी समस्या घेऊन उभा आहे. हे कुठेतरी बदलले पाहिजे म्हणून प्रत्येकाने निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी वृक्षारोपण केले पाहिजे असे सांगितलेतर या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. वैशाली देशमुख मॅडम यांनी मनोगत व्यक्त करताना, प्रत्येक व्यक्तीने आपल्या या शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या परिसरात त्यांच्या वाढदिवशी एक वृक्ष लावावा. आज महारुक्षारोपण कार्यक्रमात आपण लावत असलेल्या १०४ वृक्ष आम्ही सर्व प्राध्यापक आणि सर्व विद्यार्थी मिळून ते जपून आणि त्या वृक्षांना मोठं करू असे सांगताना या महाविद्यालयाला वृक्षामुळेच एक चांगलं निसर्गरम्य वातावरण लाभलेला आहे हे सांगितलं. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पंकज शिंदे तर प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रितेश काळेन यांनी केले. कार्यक्रमातील प्रमुख दोन्ही पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ.दादासाहेब कांबळे यांनी करून दिला तर कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ.किरण काळे मॅडम यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री शिवराज भैय्या भुमरे प्रतिष्ठानचे शुभम कांबळे, दादासाहेब कांबळे, ऋषिकेश गोरे, प्रशांत भिंगारे यांनी प्रयत्न केले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ ऑगस्ट २०२६

## पीएमश्री शाळेच्या शिक्षकांनी अवयव दानाचा संकल्प करून दिला सामाजिक बांधिलकीचा संदेश



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय अवयवदान दिनाच्या निमित्ताने पी एम श्री जिल्हा परिषद प्रशाला लाडसावंगी ता. छ. संभाजीनगर येथील मुख्याध्यापक श्री गोरखनाथ नजन यांच्यासह शिक्षक श्री नामदेव पवार व श्रीमती सारीका जैन यांनी अवयवादानाचा संकल्प केला.दिनांक 3 ऑगस्ट रोजी सोळावा राष्ट्रीय अवयवदान दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला लाडसावंगी येथील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षिका श्रीमती सारिका जैन यांच्या मार्गदर्शनाखाली अवयवदान जनजागृती पथनाट्य सादर करून उपस्थित इयत्ता पाचवी ते बारावीचे सुमारे 800 विद्यार्थी शिक्षक,पालक यांना नाटिकेतून अवयवदान व देहदान याविषयी प्रबोधन केले. विद्यार्थांना प्रेरणा देण्यासाठी शालेय समिती अध्यक्ष श्री अनिल ढोके उपस्थित होते.या अवयवदान जनजागृती नाटकेतून प्रेरणा घेऊन प्रशालेचे आदर्श मुख्याध्यापक श्री गोरखनाथ नजन तसेच शिक्षक श्री नामदेव पवार श्रीमती सारीका जैन यांनी अवयव दानासाठी शासकीय नियमानुसार नोंदणी केली.भारतात आणि जगभरात अवयवांची तीव्र टंचाई आहे दरवर्षी हजारो लोकांना मूत्रपिंड, यकृत ,हृदय यासारख्या महत्त्वाच्या अवयवांची गरज असते. भारतात आज घडीला 80 ते 90 हजार रुग्ण अवयव गरजूंच्या शासकीय यादीत नोंदणीकृत आहेत .गरजेच्या तुलनेत अवयवांची उपलब्धता खूपच कमी आहे योग्य वेळी अवयव न मिळाल्यामुळे अनेक रुग्णांचा अकाली मृत्यू होतो. ब्रेन डेड किंवा मृत व्यक्तींचे दान करणेयोग्य अवयव वेळेत गरजूंपर्यंत पोहोचल्यास अनेकांना जीवनदान मिळू शकते.याबद्दल समाजामध्ये जनजागृती होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सोळाव्या जागतिक अवयव दान दिनाच्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व उपस्थितांनी त्या सर्व परिवारांना वंदन केले ज्यांच्या अवयवदानाच्या सहमती व साहसामुळे कित्येक रुग्णांना नवजीवन मिळाले.

पीएमश्री प्रशालेच्या शिक्षकांनी अवयव दानाची नोंदणी करून विज्ञाननिष्ठ विचार आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत मानवी सेवेतील एक महान व पुण्यकारक कार्यातून समाजापुढे प्रेरणादायी आदर्श ठेवत मरणोपरांत अवयवादानाचा संकल्प करण्याचे आवाहन केले आहे.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात ८ ऑगस्ट रोजी दीक्षांत सोहळयाचे आयोजन

**उमरगा :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षांत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे.या दीक्षांत सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोल शिवाजीराव मोरे राहणार असून, मुंबई मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मा. राजेंद्र हुंजे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.या दीक्षांत सोहळ्यास भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. अश्लेष भैया मोरे, सचिव मा. जनार्दन साठे, सचिव मा. पद्माकरराव हराळकर तसेच सहसचिव मा. डॉ. सुभाष वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. संस्थेचे संचालक डॉ. विजय पाटील हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या दीक्षांत सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव होणार असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी हा सोहळा प्रेरणादायी ठरणार आहे. सोहळ्यास पदवीधर विद्यार्थी, पालक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले आहे.




## परीक्षा

एका गावात एक श्रीमंत सावकार राहत असे. गरीब जनतेची फसवणूक करून त्याने भरपूर पैसा जमा केला होता. आपल्या श्रीमंतीचा त्याला फार गर्व होता.त्या सावकाराला विजय नावाचा एकुलता एक मुलगा होता. तो बारा वर्षांचा असताना सावकाराने त्याला एका थोर ऋषीच्या आश्रमात ज्ञानप्राप्तीसाठी ठेवले होते. विजय आता बावीस वर्षांचा झाला होता. तरी गुरुजींनी विजयला घरी जाण्याची परवानगी दिली नव्हती. त्याच्याबरोबर आश्रमात शिकत असलेली काही मुलं घरी आली होती.आपला मुलगा एवढा बुद्धिमान असूनसुद्धा गुरुजींनी त्याला घरी जाण्याची परवानगी का दिली नाही, या गोष्टीचा छडा लावण्यासाठी सावकाराने स्वतः आश्रमात जाण्याचे ठरविले. बराच विचार केल्यानंतर सावकार टांग्यात बसून आश्रमाच्या दिशेने जाऊ लागला. रस्ता घनदाट जंगलातून जात होता. बरेच अंतर कापल्यानंतर सावकार आश्रमात येऊन पोहोचला. गुरुजींनी सावकाराचे योग्य स्वागत केले. फलाहार झाल्यानंतर सावकारांनी गुरुजींनी विचारले, की "वियाग्रहण करण्यासाठी विजयला आपल्याकडे दहा वर्षे ठेवले, तरी त्याला आपण घरी जाण्याची परवानगी अद्याप दिली नाही. याचे कारण जाणण्यासाठी मी इथे आलो आहे."गुरुजी नम्रपणे म्हणाले, "आपला विजय अत्यंत बुद्धिमान व आज्ञाधारक आहे. यात काही शंका नाही. जो विद्यार्थी सर्वात श्रेष्ठ असतो त्याची अजून एक शेवटची परीक्षा आम्ही घेत असतो. त्या परीक्षेत तो उत्तीर्ण झाला की आम्ही त्याला आश्रमातून घरी पाठवितो." गुरुजींचे बोलणेऐकून सावकार खिन्न झाला. तो विचार करत इकडे-तिकडे फिरू लागला. विचारात मग्न असताना सावकाराची नजर समोरच्या गोठ्याकडे गेली. त्या ठिकाणी एक तरूण तो गोठा स्वच्छ करून शेण टोपलीत भरीत होता. सावकार गोठ्याजवळ आला. त्याला वाटले असेल कुणीतरी दुसरा तरूण! पण जेव्हा त्या तरुणाचा चेहरा दृष्टीस पडला तेव्हा सावकाराला धक्काच बसला. कारण तो तरूण म्हणजे सावकाराचा मुलगा विजय होता. सावकाराला खूप राग आला. तो चिडून विजयला म्हणाला, "विजय, हे काय करतो आहेस? फेकून दे ती शेणाची टोपली. तू एवढा श्रीमंताचा मुलगा, तुला शोभतं का असली हलकी कामं करणं ?" यावर विजय शांतपणे म्हणाला, "बाबा, मी या पवित्र आश्रमात एका श्रीमंताचा मुलगा म्हणून काम करत नाही, तर एक विदयार्थी या नात्याने काम करतो. या ठिकाणी जो विद्याग्रहण करण्यासाठी येतो त्याची जात पात वगैरे काही नसते. या ठिकाणी सगळे सारखेच असतात. गुरुजी सर्व विद्यार्थ्यांना सारख्या प्रमाणात शिकवितात. मग तो श्रीमंत असो, की गरीब असो. या ठिकाणी गरीब श्रीमंत भेदभाव बाळगला जात नाही. सर्वांना समानतेची शिकवण मिळते. म्हणून या पवित्र ठिकाणी आश्रम स्वच्छ करणे काही कमीपणाचे नाही बाबा!"एवढ्यात गुरुजी तिथं आले. विजयच्या पाठीवरून हात फिरवित म्हणाले, "खरंच विजय, तुझे विचार ऐकून मी धन्य झालो. तू खरोखर माझा विद्यार्थी म्हणून शोभून दिसतोस. तू शेवटच्या परीक्षेत पास झालास. विजय, तू आज घरी जाऊ शकतोस."सावकाराने लाजेने आपली मान खाली घातली. आपली चूक त्यांना कळाली होती. त्यांनी गुरुजींचे पाय धरून क्षमा मागितली. विजयने गुरुजींना नमस्कार केला. एवढ्या वर्षांनंतर आपण घरी जात आहोत b या विचाराने त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.



- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. 9011559106

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०७ ऑगस्ट २०२६


## समृद्धी महामार्गावर मोठ्या बस व मिनी बसचे पूर्ण कागदपत्रे नसल्यास प्रवेश नाही




**दौलताबाद (जावेद अहमद) :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग मुंबई ते नागपूर हा ७०१ किलोमीटर लांबीचा आणि ६ लेनचा द्रुतगती महामार्ग आहे. हा महामार्ग पूर्णपणे सुरू झाला असून, यामुळे मुंबई ते नागपूर ७०१ किलोमीटर प्रवास आता फक्त ८ तासांत होतो. नागपूर ते ठाणे (मुंबई महानगर क्षेत्र)जोडलेले १० जिल्हे नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर,बीड, नाशिक आणि ठाणे.महामार्ग ५ जून २०२५ रोजी शेवटच्या टप्प्याच्या लोकार्पणा नंतर पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला झाला आहे. या महामार्गाचे वेगवेगळे टप्पाटप्प्याने काम पूर्ण झाले असून, पहिला टप्पा ११ डिसेंबर २०२२ रोजी सुरू झाला होता, तर अंतिम व शेवटचा टप्पा ५ जून २०२५ रोजी सुरू झाला.या काळात अनेक अपघात सुद्धा झाले यात अनेकांना जीव गमवावा लागला तर अनेकांना अपंगत्व आले आहेकाही अपघातात नंतर बस जळाली आहे अपघाताची कारण शोधत परिवहन विभागाच्या वतीने दखल घेण्यात आली आहे आता छत्रपती संभाजीनगर व वैजापूर येथील परिवहन अधिकारी वेरूळ इंटरचेंज येथे २४ तास बसेस व मिनी बसेस ची तपासणी करून सोडतात यात वाहनांचे कागदपत्रे व ड्रायव्हरचे लाइसेंस तसेच फिटनेस ,इन्शुरन्स परमिटबसेस चे इमरजेंसी exit अपघाती दरवाजा व चालकाचे ड्रंक न ड्राइव ब्रेथ विश्लेषक यंत्र analyser through तपासले जातात. ह्यातली एक ही गोष्ट समाधानकारक नसेल तर सदर वाहन समृद्धी महामार्गावरून परत पाठवली जात नाही त्यास दुसऱ्या मार्गे जाण्यास आपण समुपदेशन करत असल्याचे परिवहन अधिकारी पूजा कुचे यांनी सांगितले आहे


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


# पैठणी साडी : हातमाग परंपरेची वारसा

भारत हा विविध कला, संस्कृती, परंपरा आणि लोककौशल्यांनी समृद्ध असलेला देश आहे. भारतीय संस्कृतीच्या या वैभवशाली परंपरेमध्ये वस्त्रकलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. देशातील विविध भागांमध्ये विकसित झालेल्या पारंपरिक वस्त्रप्रकारांनी भारतीय संस्कृतीची ओळख जगभर निर्माण केली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेली पैठणी साडी ही विशेष उल्लेखनीय आहे. पैठणी ही केवळ एक साडी नसून ती महाराष्ट्राच्या इतिहासाची, कलात्मकतेची, परंपरेची आणि कुशल कारागिरांच्या अथक श्रमांची जिवंत साक्ष आहे. 7 ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग उत्पादनांचा गौरव करणे म्हणजे भारतीय कला, कौशल्य आणि श्रमसंस्कृतीचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास, सौंदर्यदृष्टी आणि कारागिरांच्या पिढ्यान् पिढ्या जपलेल्या कौशल्याचा अनमोल ठेवा सामावलेला आहे.पैठणीचा इतिहास अत्यंत प्राचीन आणि गौरवशाली आहे. महाराष्ट्रातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या प्राचीन पैठण नगरीच्या नावावरून या साडीला 'पैठणी' हे नाव प्राप्त झाले. सातवाहन काळापासून पैठण हे व्यापार, संस्कृती आणि कलांचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. प्राचीन काळात पैठण येथून तयार होणाऱ्या उत्कृष्ट दर्जाच्या वस्त्रांची देश-विदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी होती. भारतीय रेशीम आणि सूती वस्त्रांच्या व्यापारात पैठणचे महत्त्वपूर्ण स्थान होते. रोमन साम्राज्याशी भारताचा व्यापार सुरू असताना पैठण परिसरातील वस्त्रांना मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. त्यामुळे पैठणीचा इतिहास हा केवळ एका साडीचा इतिहास नसून महाराष्ट्राच्या प्राचीन व्यापार, कला आणि सांस्कृतिक समृद्धीचा इतिहास आहे.पैठणी निर्मिती ही अत्यंत कौशल्यपूर्ण आणि संयमाची प्रक्रिया आहे. पारंपरिक पद्धतीने पैठणी तयार करण्यासाठी उच्च प्रतीच्या रेशमी धाग्यांचा वापर केला जातो. धाग्यांना विशिष्ट पद्धतीने रंग देणे, त्यांची योग्य मांडणी करणे, हातमागावर विणकाम करणे आणि नक्षीकाम साकार करणे यासाठी विणकरांना मोठे कौशल्य आवश्यक असते. एक उत्कृष्ट पैठणी तयार करण्यासाठी अनेक दिवस, कधी कधी अनेक महिने लागतात. विणकर आपल्या अनुभव, कल्पकता आणि कलात्मक दृष्टीच्या साहाय्याने प्रत्येक पैठणीला एक वेगळे रूप देतात. त्यामुळे प्रत्येक पैठणी ही एक स्वतंत्र कलाकृती मानली जाते. मशीनवर तयार होणाऱ्या वस्त्रांपेक्षा हाताने विणलेल्या पैठणीचे महत्त्व याच कारणामुळे अधिक आहे.पैठणीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची आकर्षक रंगसंगती आणि वैशिष्ट्यपूर्ण नक्षीकाम. पारंपरिक पैठणीमध्ये मोर, कमळ, आंबी, नारळी, अश्रफी, वेलबुट्टी आणि विविध प्रकारच्या पारंपरिक आकृत्यांचा वापर केला जातो. पैठणीच्या पदरावर विणले जाणारे मोराचे चित्र हे तिची खास ओळख मानले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये मोर हा सौंदर्य, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे पैठणीच्या पदरावरील मोराची नक्षी विशेष आकर्षण निर्माण करते. सोन्या-चांदीच्या झरीचा वापर, रेशमी धाग्यांची चमक आणि रंगांची सुंदर सांगड यामुळे पैठणीला राजेशाही स्वरूप प्राप्त होते.महाराष्ट्रातील स्त्रियांच्या भावविश्वात पैठणीला अत्यंत मानाचे स्थान आहे. लग्नसमारंभ, सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि विशेष प्रसंगी पैठणी परिधान करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे. मुलीच्या विवाहाच्या वेळी माहेरकडून दिली जाणारी पैठणी ही प्रेम, आशीर्वाद आणि सन्मानाचे प्रतीक मानली जाते. अनेक कुटुंबांमध्ये आजी-आईकडून पुढील पिढीकडे पैठणी जपून ठेवण्याची परंपरा आहे. त्यामुळे पैठणी ही केवळ वस्त्र राहत नाही, तर ती कुटुंबाच्या आठवणी, भावना आणि सांस्कृतिक वारशाचा भाग बनते.पैठणीच्या विकासामध्ये महाराष्ट्रातील विविध राजवटींचे योगदान राहिले आहे. सातवाहन काळापासून सुरू झालेली ही वस्त्रपरंपरा पुढे यादव, बहमनी, निजाम आणि मराठा काळात अधिक विकसित झाली. राजघराण्यांमध्ये पैठणीचा वापर प्रतिष्ठेचे आणि वैभवाचे प्रतीक म्हणून केला जात असे. विशेषतः मराठा काळात पैठणीला मोठा राजाश्रय मिळाला. दरबारातील स्त्रिया आणि उच्चवर्गीय समाजामध्ये पैठणीला विशेष स्थान होते. विविध राजवटींच्या प्रभावामुळे पैठणीच्या डिझाइनमध्ये, रंगांमध्ये आणि नक्षीकामामध्ये विविधता निर्माण झाली. या ऐतिहासिक प्रवासातून पैठणीने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.पैठणीच्या निर्मितीमध्ये विणकर समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक विणकर कुटुंबांनी पिढ्यान् पिढ्या या कलेचे जतन केले आहे. त्यांच्या हातातील कौशल्यामुळेच पैठणीसारखी अप्रतिम कलाकृती आजही अस्तित्वात आहे. मात्र, या पारंपरिक कलेमागे असलेल्या विणकरांच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. मोठ्या मेहनतीनंतर तयार होणाऱ्या पैठणीला योग्य बाजारभाव मिळणे, कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, आर्थिक अडचणी आणि बदलत्या बाजारपेठेतील स्पर्धा या समस्या विणकरांसमोर आहेत. त्यामुळे पैठणीच्या संवर्धनाबरोबरच पैठणी विणणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.आधुनिक काळात पैठणीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. यंत्रमागावर तयार होणाऱ्या स्वस्त साड्यांमुळे पारंपरिक हातमाग पैठणीला स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा बनावट किंवा कमी दर्जाच्या साड्यांना पैठणी म्हणून विकले जाते, त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होते आणि अस्सल पैठणी तयार करणाऱ्या कारागिरांचे नुकसान होते. अस्सल पैठणीची ओळख, तिची गुणवत्ता आणि पारंपरिक वैशिष्ट्ये याबाबत ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचे संरक्षण करण्यासाठी शासन, समाज आणि ग्राहक यांनी संयुक्त प्रयत्न करणे गरजेचे आहे.पैठणीच्या संवर्धनासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. पैठणीला भौगोलिक मानांकन मिळाल्यामुळे तिची स्वतंत्र ओळख अधिक मजबूत झाली आहे. विविध प्रदर्शनांमधून, सांस्कृतिक महोत्सवांमधून आणि डिजिटल माध्यमांद्वारे पैठणी देश-विदेशातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहे. आज अनेक विणकर आणि उद्योजक ऑनलाइन माध्यमांचा वापर करून थेट ग्राहकांशी संपर्क साधत आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक कलेला आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होत आहे. यामुळे पैठणी उद्योगाला नव्या संधी निर्माण होत आहेत.बदलत्या काळानुसार पैठणीने आधुनिकतेशीही जुळवून घेतले आहे. पारंपरिक नक्षी आणि रंगसंगती जपत नवीन डिझाइन, विविध प्रकारचे रंग आणि आधुनिक फॅशनच्या गरजेनुसार पैठणीमध्ये प्रयोग केले जात आहेत. अनेक फॅशन डिझायनर्सनी पैठणीला आधुनिक पोशाखांमध्ये स्थान दिले आहे. त्यामुळे तरुण पिढीमध्येही पैठणीविषयी आकर्षण वाढत आहे. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय फॅशन क्षेत्रात पैठणीला मिळणारी प्रसिद्धी ही तिच्या बदलत्या काळाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचे उदाहरण आहे.पैठणी ही पर्यावरणपूरक जीवनशैलीचेही प्रतीक आहे. हातमागावर तयार होणाऱ्या या साडीच्या निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणावर मानवी कौशल्याचा वापर केला जातो. यंत्राधारित मोठ्या प्रमाणातील उत्पादनाच्या तुलनेत हातमाग उद्योग पर्यावरणासाठी अधिक अनुकूल आहे. आज जगभरात शाश्वत फॅशन आणि पर्यावरणपूरक उत्पादनांना महत्त्व दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग वस्त्रांचे महत्त्व अधिक वाढले आहे.राष्ट्रीय हातमाग दिन हा भारतीय हातमाग परंपरेचा गौरव करण्याचा दिवस आहे. या दिवशी पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचा सन्मान करणे म्हणजे केवळ एका साडीचा गौरव करणे नव्हे, तर तिच्यामागील हजारो वर्षांच्या परंपरेचा, असंख्य विणकरांच्या श्रमांचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राचा इतिहास, कला आणि संस्कृती विणलेली आहे. त्यामुळे या वारशाचे संरक्षण करणे, विणकरांना प्रोत्साहन देणे आणि अस्सल हातमाग उत्पादनांचा स्वीकार करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.पैठणी ही महाराष्ट्राची ओळख आहे, अभिमान आहे आणि सांस्कृतिक संपत्ती आहे. तिच्या रेशमी धाग्यांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर परंपरा, श्रम, भावना आणि इतिहासाचा संगम आहे. राष्ट्रीय हातमाग दिनाच्या निमित्ताने आपण पैठणीसारख्या अमूल्य वारशाचे जतन करण्याचा आणि या कलेला पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण पैठणीचा प्रत्येक धागा हा केवळ साडीचा भाग नसून महाराष्ट्राच्या गौरवशाली संस्कृतीचा एक अमूल्य धागा आहे.




**सुजाता मोरे,**
(लेखिका, पर्यटन प्रशासन शास्त्राच्या अभ्यासक आहेत)
ईमेल – sujata.more२१०३@gmail.com